MHAU050029322025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१७/२०२५**

एकनाथ अनाजी त्रिभुवन

वि.

निरंक

**निशाणी क्र.१ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार एकनाथ अनाजी त्रिभुवन यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार यांचे भाऊ नामे लक्ष्मण अनाजी त्रिभुवन यांचे दि. ०१.११.२०१८ रोजी नगिनापिंपळगाव, ता. वैजापुर येथे निधन झालेले आहे. तसेच अर्जदार यांची भावजई नामे तुळसाबाई लक्ष्मण त्रिभुवन यांचे दि.०१.०४.२०२१ रोजी नगिनापिंपळगाव, ता. वैजापुर येथे निधन झालेले आहे. मयत लक्ष्मण अनाजी त्रिभुवन व तुळसाबाई लक्ष्मण त्रिभुवन यांना कोणीही मुलबाळ नव्हते व त्यांचा सांभाळ, पालनपोषण व अंत्यविधी अर्जदार यांनीच केलेला आहे. मयत लक्ष्मण अनाजी त्रिभुवन व तुळसाबाई लक्ष्मण त्रिभुवन यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार यांना शासकिय कामांकरीता व इतर वैयक्तीक कामांकरीता वारस प्रमाणपत्राची गरज आहे म्हणून अर्जदारांनी सदरचा अर्ज मयत लक्ष्मण अनाजी त्रिभुवन व तुळसाबाई लक्ष्मण त्रिभुवन यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

३. अर्जदार यांनी अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहीर प्रकटन दिल्याप्रमाणे दैनिक ''महाभूमि'' या वृत्तपत्रात दिनांक ०९.०७.२०२५ रोजी

प्रकाशित करण्यात आले व अर्जाबद्दल काही आक्षेप असल्यास न्यायालयास कळविण्यास सांगितले, परंतु अद्याप न्यायालयास कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही.

**४.** अर्जदार यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असून त्यामध्ये त्यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे कथन केलेले आहे. अर्जदार यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्टयर्थ अर्जासोबत मयत लक्ष्मण अनाजी त्रिभुवन व तुळसाबाई लक्ष्मण त्रिभुवन यांच्या मुळ मृत्यु प्रमाणपत्राची स्कॅन प्रत आणि अर्जदार यांच्या मुळ आधार कार्डची स्कॅन प्रत दाखल केलेली आहे. तसेच अर्जदार यांनी पुरावा बंद पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

**५.** अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रस्तुतच्या अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारतर्फे दाखल करण्यात आलेला लेखी पुरावा हा तोंडी पुराव्यास पुरक असून अबाधित आहे. अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज व जाहीर प्रकटन दाखल केल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदार हे मयत लक्ष्मण अनाजी त्रिभुवन व तुळसाबाई लक्ष्मण त्रिभुवन यांचे वारस असून त्यांना इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे. वरील कथने विचारात घेता मयत लक्ष्मण अनाजी त्रिभुवन व तुळसाबाई लक्ष्मण त्रिभुवन यांचे अर्जदार हेच वारस असल्याचे स्पष्ट होते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार **एकनाथ अनाजी त्रिभुवन** हे मयत लक्ष्मण अनाजी त्रिभुवन व तुळसाबाई लक्ष्मण त्रिभुवन यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येत आहे

३. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरीता अर्जदार यांनी नियमाप्रमाणे योग्य ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

Digitally signed by BENDRE MONALI ASHOK
Date: 2026.04.08 17:49:43 +0530

**दिनांक** – ०८.०४.२०२६.
**ठिकाण –** वैजापुर.

**( श्रीमती मोनाली अ. बेंद्रे )**
३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
वैजापुर, जि. औरंगाबाद.